**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक कार्यालय, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती**
**(शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था परिसर) अमरावती -444 604.**
Web: www.jdheamravati.org.in Email-Jdheamt@yahoo.com
क्रमांक -०७२१-२५३१२३५ फॅक्स क्र. ०७२१- २५३१४५७

जावक क्रमांक- सर्स/उशि/आस्था/१८/ 9 52 दिनांक २८ /०२ /२०१८

**अत्यंत महत्त्वाचे** 6/3/2018

प्रति,

**संचालक,**
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था,
अमरावती.

**संचालक,**
भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र,
अमरावती.

**गृहप्रमुख,**
शासकीय इ.बी.सी. मुलांचे वसतीगृह,
अमरावती व यवतमाळ.

**प्राचार्य,**
शासकीय अध्यापक महाविद्यालय,
अकोला, बुलडाणा व यवतमाळ.

**लेखाधिकारी,**
उच्च शिक्षण,अनुदान,
अमरावती विभाग,अमरावती.

**विषय :- दिनांक २६.०२.२०१८ पासुन महाराष्ट्र विधनमंडळाचे पहिले अधिवेशन सुरु झाले आहे त्यासाठी आवश्यक असणारी माहिती सादर करणेबाबत**

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०१८ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन मुंबई येथे दिनांक.२६ फेब्रुवारी २०१८ रोजी सुरु झालेले आहे. त्या अनुषंगाने आपणास पुढीलप्रमाणे महत्त्वाच्या सूचना देण्यात येत आहेत.

१. महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०१८ चे पहिले काळात आपल्या कार्यालयाशी संबंधित अत्यावश्यक माहितीची आवश्यकता भासल्यास ती तातडीने प्राप्त करुन घेण्याकरीता आपण मुख्यालयी उपस्थित असणे आवश्यक आहे.

२. महाराष्ट्र विधानमंडळाचे कामकाजाशी संबंधित कामे हाताळण्याकरिता आपल्या स्तरावर जबाबदार अधिकाऱ्यांची नेमणुक करुन त्यांचे नांव, भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक व निवासस्थानाचा क्रमांक संचालनालयास व या कार्यालयास न चुकता कळविण्यात यावा.

३. अधिवेशन काळात बरेचदा काही माहिती शासनास/ संचालनालयास अत्यंत तातडीने सादर करावी लागत असल्यामुळे **कार्यालयीन वेळेपूर्वी एक तास व कार्यालयीन वेळेनंतर कमीत कमी एक तास** पर्यंत कार्यालयात उपस्थित राहावे.

४. कार्यालयातील दूरध्वनी यंत्रे, फॅक्स यंत्रे इत्यादी जलद संपर्काची साधने अधिवेशन काळात सुस्थितीत राहतील याची काळजी घेण्यात यावी. जलद संपर्काअभावी विधीमंडळ अधिवेशनासंबंधातील कामात काही समस्या निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आपली राहील याची कृपया प्रामुख्याने नोंद घ्यावी.

५. आपणाशी आणि कार्यालयातील संबंधीत अधिकारी/ कर्मचाऱ्यांशी दूरध्वनीवरुन तातडीने संपर्क साधणे शक्य व्हावे म्हणून निवासाचे दूरध्वनी व भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक कार्यालयास कळविण्यात यावेत.

६. अधिवेशन काळात कोणत्याही अधिकारी/ कर्मचाऱ्यांना अतिशय महत्त्वाच्या कारणाशिवाय रजा मंजूर करता येणार नाही, याची नोंद घ्यावी व सर्व अधिकारी /कर्मचाऱ्यांना याची जाणीव करुन देण्यात यावी.

वरील सूचना ह्या महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिवेशनाशी संबंधित महत्त्वाच्या सूचना असल्यामुळे कृपया त्यांचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी.

(डॉ. अर्चना नेरकर)
सहसंचालक, उच्च शिक्षण
अमरावती विभाग, अमरावती

प्रत-मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीकरिता सविनय सादर.

Scanned by CamScanner